दिः 10 मार्च,2014

# पुण्याचे पापाशी मिलन

**अरुण जेटली**

विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

2014 च्या सामान्य निवडणुकांच्या तयारीमध्ये मागील चोवीस तास खुप सा-या घटनांनी भरले होते. भाजपाच्या आसपास जमवाजमव जारी आहे. गोरखा जनमुक्ती यांनी दार्जीलींग आणि उत्तर बंगालच्या काही निर्वाचन क्षेत्रात भाजपाला समर्थन देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या समर्थनाने भाजपाला विजयी होण्याची शक्यता वाढली आहे. बंगाल मध्ये काही जागा जिंकण्याची शक्यता आता खरी ठरत आहे. याचप्रकारे आसाम गण परिषदेचे माजी अध्यक्ष चंदर मोहन पटवारी यांच्या नेतृत्त्वाखाली आसाम गण परिषदेने भाजपात शामिल होण्याचा निर्णय घेतला आहे. हे अपेक्षित होते की भाजपा आसाम मध्ये लोकसभेच्या अनेक जागेसाठी गंभीर दावेदार आहे. आसाम गण परिषद आसाम मधील भाजपात शामिल झाल्याने भाजपा आणखी मजबुत होईल कारण आसाम मध्ये हेच एकमात्र कॉंग्रेस विरोधी पक्ष आहे.

भाजपाला सक्षम करण्यासाठी अनेक राज्यात अन्य पक्षांना सोडून येणा-या काही लोकांशिवाय, येणारे काही दिवस तीन दक्षिणी राज्य कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू मध्ये वर्तमान स्थितीत भाजपा आणि एनडीएला मजबूत बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण असतील. या घटनाक्रमांत भारताच्या पूर्व आणि दक्षिण भागात भाजपाची ताकद वाढेल जिथे भाजपा मजबूत राजकीय पक्ष नव्हता.

याचप्रकारे, कॉंग्रेस आणि आम आदमी पक्षात सुद्धा एक महत्त्वपूर्ण घटनाक्रम पाहावयास मिळाला. मध्यप्रदेश मध्ये भिंड येथून कॉंग्रेसच्या उमेदवाराने पक्षाचे नामांकन नामंजुर करण्याबरोबरच भाजपात शामिल होण्याचा निर्णय घेतला आहे. चंदिगड हे अन्य एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे जिथे एएपीला मोठे समर्थन मिळण्याचा दावा ते करत आहेत. चंदीगड मध्ये त्यांच्या उमेदवाराने पक्षाचे नामांकन परतवण्याचा निर्णय घेतला आहे कारण की त्यांचे कार्यकर्ता उलट-पलट करण्यात लागले आहेत आणि त्यांचे मानणे आहे की, त्यांच्या निर्वाचन क्षेत्रात संघटनात्मक समर्थनाची कमतरता आहे. मोठ्या संख्येने लोक त्या पक्षाकडे सरकत आहेत त्यांना वाटत आहे की ते भावी विजेते आहेत. कोणत्याही उमेदवाराची सार्वजनिक घोषणा झाल्यानंतर त्यांच्याद्वारे पक्षाचे नामांकन अस्वीकार करणे मोठी घटना आहे. असे तेव्हाच होते जेव्हा उमेदवाराला जिंकण्याची शक्यता नसते.

आम आदमी पक्षाचा मिडीया सोबत हनीमून संपलेला दिसतो. तथापि मिडीया पक्षाच्या हालचालींबद्दल विस्ताराने माहिती देत आला आहे मात्र आता तो अन्य राजकीय पक्षांप्रमाणे याचीसुद्धा गंभीरपणे चौकशी करण्यास तयार आहे. मिडीयाच्या एएपीला खुप अधिक कवरेज देण्यामुळे ती भाजपाची टेलीव्हीजन वर विरोधी बनली तर मैदानात तिची विरोधी कॉंग्रेस बनली आहे. एक लोकप्रिय व्हीडीओ यु ट्युब वर टाकण्यात आला आहे. या विडिओत दाखविण्यात आले आहे की, एएपीचे अध्यक्ष एका प्रमुख न्यूज चॅनेलच्या एंकर सोबत इंटरव्यूनंतर गहन विचार-विमर्श करण्यात मग्न झाले आहेत. दोघेही मुलाखतीचे संभावित परिणाम आणि संपादन संदर्भात बातचीत करत आहेत. ते योजना बनवित आहेत की कोणता भाग आता उजेडात आणायचा आणि असा कोणता भाग दबवायचा आहे ज्यामुळे मध्यमवर्गाचे समर्थन मिळण्यास नुकसान होऊ शकेल. आम्ही कधी इतके भाग्यवान नाही राहिलो की कोणत्या एंकर किंवा मिडीया संघटनेने आम्हाला याप्रकारची विशेष सुविधा दिली आहे. एक खास छबी बनविण्याच्या इराद्याने अनुकूल आणि कपटपूर्ण मुलाखत एएपीच्या कूटनीतीचा हिस्सा आहे. यामुळे स्पष्ट आहे की पक्ष आणि त्यांचे नेते ज्या गोष्टीला उघड करण्यासाठी प्रयत्नशील आहेत जी आहेच नाही. ते स्वतः अशी छबी दाखवित आहेत जी काल्पनिक आहे. वास्तविकता आणि कल यांच्यात कोणताही तालमेळ नाही. जेव्हा पुण्याचे पापाशी मिलन हेते तेव्हा तुम्ही कपटाची अपेक्षा करु शकत नाही.